मटा CITIZEN REPORTER
तुम्हाला भेडसावणाऱ्या समस्या, 'दिसणाऱ्या' बातम्या मांडू शकता 'महाराष्ट्र टाइम्स'च्या या व्यासपीठावर
MT Citizen Reporter हे अॅप गुगल प्ले स्टोअर, अॅपल अॅप स्टोअरवरून डाऊनलोड करता येईल.

महाराष्ट्र टाइम्स
# पुणे TIMES

महाराष्ट्र टाइम्स CULTURE Club
आजच रु. २९९/- चा चेक (BCCL च्या नावाने) देऊन, घ्या कल्चर क्लब कार्ड व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या तिकिटांवर मिळवा आकर्षक सूट आणि बरंच काही

पुणे, गुरुवार, २५ मे २०१७
ADVERTORIAL, ENTERTAINMENT PROMOTIONAL FEATURE

## अमेय-मिथिलाशी दिलखुलास गप्पा

▸▸ पुणे टाइम्स टीम

आधी कप साँग आणि 'गर्ल इन द सिटी' या वेबसीरिजमुळे चर्चेत आलेली मिथिला पालकर, कैवल्यची भूमिका गाजवलेला आणि सध्या 'कास्टिंग काउच' करणारा अमेय वाघ, यांच्या चाहत्यांसाठी एक खूषखबर आहे. हे आघाडीचे कलाकार चाहत्यांच्या प्रत्यक्ष भेटीला येत असून, त्यांच्याशी आगामी सिनेमा, इतर छंद, सोशल नेटवर्किंगचा मुक्त वावर, नाटक, कप साँग याबाबत दिलखुलास गप्पा मारता येणार आहेत. 'महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब'च्या वतीनं २७ मे रोजी यांच्याशी 'मीट अँड ग्रीट'चं आयोजन करण्यात आलं आहे.

नवी पेठेतील पत्रकार भवनामध्ये इथं दुपारी ३ वाजता हा गप्पांचा कार्यक्रम रंगणार आहे. 'नाटक कंपनी'मधून आपल्या करिअरची सुरुवात केलेल्या अमेयचं फिल्मी करिअर सध्या आकाराला येतं आहे. 'कास्टिंग काउच' या वेबसीरिजमधून आणखी नावारूपाला आलेल्या अमेयचे सोशल मीडियावर बरेच चाहते असून, त्यांच्या संपर्कात राहण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो. वेळात वेळ काढून नाटक, वेबसीरिजचा नवा एपिसोड, आगामी सिनेमा याबाबत तो चाहत्यांना नेहमी अपडेट ठेवतो.

'तुझी चाल तुरू तुरू' हे गाणं 'कप साँग' या प्रकारात गाजवल्यानंतर मिथिला सगळ्यांत आधी सोशल मीडियावर झळकली. त्यानंतर तिनं डेहराडूनमधून मुंबईत फॅशन डिझायनिंगचं करिअर करण्यासाठी आलेल्या मुलीची भूमिका 'गर्ल इन द सिटी'मध्ये निभावली. पहिल्या भागानंतर या वेबसीरिजचा दुसरा भागही लोकप्रियता मिळवतो आहे. 'द लिटिल थिंग्ज' ही तिची वेबमालिकाही चर्चेत होती. अमेय आणि मिथिलासोबत चिन्मयी सुमित आणि सचिन खेडेकरही त्यांच्यासोबत चाहत्यांशी गप्पा मारायला उपस्थित राहणार आहेत. 'कल्चर क्लब' सदस्यांना या 'मीट अँड ग्रीट'साठी प्राधान्यानं प्रवेश दिला जाईल. इतर वाचकांना प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश मिळेल.


मिथिला पालकर
अमेय वाघ

फेसबुक लिंक : https://www.facebook.com/MTCultureClub
ट्विटर लिंक : https://twitter.com/MTCultureClub

टिप : कल्चर क्लबच्या वेबसाइटवर जाण्यासाठी हा कोड तुमच्या मोबाइलवर स्कॅन करा.

## बाइकवर युरोपभर

**१८ देश, २० हजार किलोमीटर आणि १०० दिवस, तेही बाइकवर. वेडेपणा अंगात पुरता भिनला असल्याशिवाय कुणी हे करणं शक्य नाही. अनुराधा आणि मानस दिवाण हे मध्यमवयीन जोडपं करिअरच्या महत्त्वाच्या टप्प्यावर ब्रेक घेऊन येत्या १० जूनपासून या प्रवासाला सुरुवात करणार आहे.**

▸▸ पुणे टाइम्स टीम

दिनक्रमातून काही काळाची सुट्टी घेऊन आणि सर्व जबाबदाऱ्यांमधून मुक्त होऊन दोन जण एका सफरीवर निघणार आहेत. हा प्रवास आहे १०० दिवसांचा आणि २० हजार किलोमीटरचा. अनोळखी संस्कृतीचा शोध घेण्याच्या प्रयत्नात निघालेलं हे जोडपं आहे, अनुराधा आणि मानस दिवाण. 'टाइम्स ऑफ इंडिया'सह मोठमोठ्या कंपन्यांमधून कार्यरत असलेले ४३ वर्षांचे मानस आणि कॉर्पोरेट ट्रेनर आणि तत्त्वज्ञान विषयाच्या प्राध्यापिका अनुराधा यांची आत्तापर्यंतची प्रवासाची आवड आणि अनुभव या प्रवासात पणाला लागणार आहे.

लग्नाला १६ वर्षं झाल्यानंतर एका क्षणी काही वेगळं करून पाहाण्याचं डोक्यात आलं. करिअरच्या शिखरावर असतानाच त्यातून ब्रेक घेणं अजिबातच सोपं नाही; पण मग खरं आयुष्य मनापासून जगायचं तरी कधी, याच विचारातून हे जोडपं दोन जून रोजी पुण्यातून या बाइक राइडला निघणार आहे. त्यांची बाइक यापूर्वीच जहाजावरून स्पेनला निघालेली आहे. प्रत्यक्षात त्यांच्या बाइक राइडची सुरुवात स्पेनमधून १० जून रोजी होणार आहे. डुकाटीच्या स्क्रॅम्बलर या बाइकवर त्यांचा हा साहसी प्रवास होणार असून, ते पोर्तुगाल, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड, लियकटेन स्टाइन, इटली, चेक क्रोएशिया, स्लोव्हाकिया, हंगेरी आणि बाल्कन राज्यांमधून तुर्कस्तान असे १८ देश फिरणार आहेत. या राइडला त्यांनी तितकंच समर्पक असं 'दोस्ती ऑन व्हील्स' असं नाव दिलं आहे.

दोन दिवस ते एक महिन्यापर्यंत केलेल्या छोट्या सहलींपासून ही सुरुवात झाली असून, यापूर्वी दिवाण यांनी फ्रान्स ते जर्मनी या मार्गावर राइड केली आहे. ७-८ वेळा लेहलाही ते जाऊन आले आहेत. मुळातच फिटनेसचं जबरदस्त वेड असणारे हे दोघं असल्यानं त्यांना या प्रवासात शारीरिक आणि मानसिकही काळजी नेमकी काय घ्यायची, याची पूर्ण कल्पना आहे. त्यांनी यासाठी महिन्याभरापूर्वीपासूनच २४ सूर्यनमस्कार घालायला सुरुवात केली आहे.



प्रवासादरम्यानही रोज ४५ मिनिटं ते हा व्यायाम करणार आहेत. त्यामुळे बाइकवरची पाठदुखी, मांड्या किंवा हिप्सना त्रास होणं ते कमी करू शकतील. ४० थांबे घेत होणाऱ्या या प्रवासासाठीचा अंदाजे २५ लाख खर्च येणार असल्याचा अनुराधा यांचा अंदाज आहे.

जून ते सप्टेंबरदरम्यान युरोपमध्ये पाऊस असतो. यासाठी दिवाण यांनी घट्ट थर्मल कपडे, रायडिंगचीच पावसातही वापरता येतील, अशी बहुउपयोगी जॅकेट्स आणि स्पेन, पोर्तुगाल, तुर्कस्तानातील खूप गरम होणाऱ्या वातावरणात घालण्यासाठी सुती कपडे असं नियोजन केलं आहे. वाऱ्यापासून त्वचा, कान, डोळे आणि एकूणच आरोग्य उत्तम राखण्यासाठी रायडिंगचं जॅकेट आणि हेल्मेट मात्र उकाड्यातही घालायचंच, असाही त्यांनी स्वत:साठी नियम करून घेतला आहे. 'परदेशात पाऊल टाकलं, की आपण स्वत:च्या देशाचं प्रतिनिधित्व करतो, हे लक्षात ठेवूनच मोठ्या जबाबदारीनं आणि आपल्या देशाचं नाव कुठेही खराब होऊ न देता हा प्रवास करणार,' असं दिवाण सांगतात. त्यांचा हा प्रवास सप्टेंबर किंवा ऑक्टोबरपर्यंत संपून ते भारतात परतणार आहेत.

ऑटो गिअर Cars ◆ Bikes | माझी अस्सल साथीदार ३

**या प्रवासात आम्ही स्थानिक खाद्यपदार्थांची ओळख करून देणार आहोत. मॉडर्न डे जिप्सींशी भेट, तिथली महत्त्वाची स्थळं, फूड जॉइंट्स, विचारवंत, कलाकार यांची भेट आणि अनोळखी लोकांशी ओळख करून घेणं यातून हा प्रवास आम्हाला समृद्ध करणारा ठरेल. आमच्यासारखे अत्यंत सामान्य लोकही फक्त काटेकोर नियोजनानं असा प्रवास करू शकतात, हेही आम्हाला लोकांपर्यंत पोहोचवायचं आहे.** - अनुराधा दिवाण



### मिर्चमसाला

#### कानामागून आली...

'पिंक', 'नाम शबाना' यांसारख्या सिनेमांतून **तापसी पन्नू**नं आपली छाप पाडली. या सिनेमात उत्कृष्ट भूमिका साकारून तिनं इंडस्ट्रीत स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं. आता सिनेमांसह तिच्यावर जाहिरातींच्या ऑफर्सचा पाऊस पडतो आहे. यातल्याच एका ब्रँडनं तापसीला चक्क कंगना रनोटपेक्षा जास्त मानधन दिल्याचं समजतं. त्यामुळे सध्या ही अभिनेत्री कानामागून आली तिखट झाली अशी जोरदार चर्चा बॉलिवूडमध्ये आहे.

#### भाऊची चर्चा



मराठी कलाकारही सोशल मीडियावर हल्ली चांगलेच अॅक्टिव्ह झाले आहेत. प्रेक्षकांना खळखळून हसवणारा प्रेक्षकांचा लाडका **भाऊ कदम** हल्ली इन्स्टाग्रामवर सतत काही ना काही पोस्ट करत असतो. विशेषत: त्यानं पोस्ट केलेल्या 'गुड मॉर्निंग मेसेज'ची खूप चर्चा असते. 'अपयश ही यशाची पहिली पायरी असते,' असं सांगत भाऊ चाहत्यांना बऱ्याचदा सुप्रभात करताना दिसतो. खूप संघर्ष करत पुढे आलेला हा कलाकार अद्याप जुने दिवस विसरलेला नाही हेच त्याच्या संदेशांमधून दिसून येतं.

#### फॅशन का जलवा



यावर्षी कान महोत्सवाच्या रेड कार्पेटवर पहिल्यांदाच **दीपिका पदुकोण**च्या फॅशनचा जलवा बघायला मिळाला. अनेक प्रतिष्ठित राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मासिकांनी तिच्या स्टाइलचं कौतुक केलं. अगदी सर्वोत्तम फॅशनच्या यादीतही तिचं नाव घेण्यात आलं. तिच्या फॅशन सेन्सवर सगळेच एकदम फिदा झालेत म्हणे. या चमकण्यामागे माझ्यापेक्षाही स्टायलिस्ट्सचा मोठा हात असल्याचं दीपिका अगदी नम्रतेनं सांगते.

## अच्छा, ट्विटर...

▸▸ पुणे टाइम्स टीम

आक्षेपार्ह वक्तव्य करणारा गायक अभिजित भट्टाचार्यचं ट्विटर अकाउंट बंद करण्यात आलं. त्यानंतर गायक सोनू निगमनंही ट्विटरला बाय बाय केला आहे. बुधवारी सकाळी सोनूनं २४ ट्विट्स करत आपली बाजू मांडली आणि ट्विटर अकाउंट बंद करत असल्याची जाहीर घोषणा केली.आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या, धमकी देणाऱ्या ९० टक्के ट्विटर युझर्सची अकाउंटही सस्पेंड केली पाहिजेत, अशी मागणीही सोनूनं केली आहे. त्यानं पोस्टमध्ये म्हटलंय, की मी उजव्या किंवा डाव्या विचारसरणीचा नाही. मी प्रत्येकाच्या मताचा आदर करतो; पण ट्विटरवर तुम्हाला कोणत्यातरी एकाच मुद्द्यावर बोलणं क्रमप्राप्त आहे. मी कोणत्याही विशिष्ट धर्माचा नाही. प्रत्येकाकडून (धर्म) चांगल्या गोष्टी वेचत मी माझं जीवन जगतो.

सोनूच्या या पोस्टवरून तो ट्विटरला कायमस्वरूपी टाटा करणार, की काही काळ फक्त ब्रेक घेत वातावरण शांत व्हायची वाट पाहणार हे आत्ताच सांगणं कठीण आहे. आधी ट्विटर बंद केलेले आणि पुन्हा त्यावर अॅक्टिव्ह झालेले कलाकारही इंडस्ट्रीत आहेत. खरं तर सेलिब्रेटींना सोशल मीडियापासून दूर राहणं शक्य नाही; कारण चाहत्यांच्या संपर्कात न राहणं त्यांना परवडणारं नाही. तसंच, स्वत:च्या प्रसिद्धीचे मार्गही बंद होतात. त्यामुळे भविष्यात सोनू काय निर्णय घेतो, हे लवकरच कळेल.

### यांनी घेतला ब्रेक

सोशल मीडियावर मत व्यक्त करण्याबाबत बिनधास्त असणाऱ्या आणि कुणावरही टीका करणाऱ्या ऋषी कपूर यांनी काही दिवसांपूर्वी ट्विटरला रामराम ठोकला होता. त्यानंतर पुन्हा ते जॉइनही झाले. सलमान खानच्या 'हिट अँड रन केस'च्या निकालाप्रसंगी २०१५मध्ये गायक अभिजित आणि ऐझाज खान यांनी केलेल्या टीकेनंतर ऋषी कपूर बरसले होते. या ट्विट्सवरून ऋषी कपूर यांच्यावरही बरीच टीका झाली. 'एका ज्येष्ठ कलाकाराविषयी सोशल मीडियावर वापरण्यात येणाऱ्या अर्वाच्य भाषेचा मी जाहीर निषेध करतो. यातून अनादर व्यक्त होतो हे अनेकांच्या लक्षातही येत नाही. त्यामुळे मी सोशल मीडियातून निवृत्ती घेत आहे,' असं म्हणत त्यांनी ट्विटर अकाउंट बंद केलं होतं. यानंतर साजिद खाननं त्यांची मनधरणी केली म्हणे आणि ते पुन्हा ट्विटरवर अॅक्टिव्ह झाले.

### शाहरूख खान

२०१३च्या सुमारास शाहरूख खानला बरंच ट्रॉलिंग झेलावं लागलं. त्यामुळे 'धर्माला अनुसरून मी अनेकदा इंटरनेटवर बऱ्याच कमेंट वाचतो. त्यामुळे चर्चा-वादही झडतात. मला वाटलं होतं, हे सोशल मीडियाचं हे व्यासपीठ संकुचित विचारसरणीमध्ये बदल करेल; पण तसं काही घडलं नाही. मलाच टार्गेट करण्यात आलं,' असं म्हणत किंग खाननं ट्विटर अकाउंटवरून ब्रेक घेतला होता.

### आमिर खान

किंग खानप्रमाणे आमिर खानही धार्मिक असहिष्णुतेवरून टीकेचं लक्ष्य झाला होता. त्याची बायको किरण रावनं भारतातील असहिष्णुता पाहून देश सोडू जावंसं वाटतंय, असं विधान करून वादंग उठवला होता. त्यामुळे आमिरनं काही काळ ट्विट्स बंद करण्याचा निर्णय घेतला. आता तो इथं अॅक्टिव्ह असला, तरी सिनेमा प्रमोशन, पाणी फाउंडेशनबाबत अपडेट्सच करत असतो.


सलमान खान
सोनू निगम
सुशांतसिंग राजपूत

### सुशांतसिंग राजपूत

गर्लफ्रेंड अंकिता लोखंडेसोबत ब्रेकअप झाल्यानंतर सुशांत सिंग राजपूतला चाहत्यांनी टार्गेट केलं होतं. सगळ्यांनी आपापल्या मनाची कारणं टाकून ब्रेकअप का केलं, असा जाब त्याला विचारत ट्रोल केलं. याचा राग सहन न झाल्यानं आणि ब्रेकअपवर काहीच भाष्य करायचं नसल्यानं त्यानं ट्विटरवरून काही काळ ब्रेक घेतला. आता मात्र राबताचं शूटिंग संपल्यानंतर त्यानं पुन्हा एकदा ट्विटरची वाट धरली आहे.

### सलमान खान

या यादीत सलमान खानही आहे. सलमान-आमिर-शाहरूख यांच्यात कुणाचे चाहते अधिक अशी स्पर्धा फॉलोअर्सनं लावल्यानंतर सलमान खाननं त्यांना चांगलंच सुनावत ट्विटरवरून ब्रेक घेतला होता. फॉलोअर्सच्या संख्येवरून खान्समध्ये भांडणं लावण्याचे बेजबाबदार चाहत्यांचे प्रयत्न त्याला पटले नव्हते.

## बकवास; पण अस्सल



**सर रॉजर मूर यांनी जेम्स बाँड तब्बल सातवेळा साकारला. वयाच्या पन्नाशीतही ते बाँड म्हणून शोभून दिसले. बाँड हा रिडीक्युलस आहे, असं प्रत्यक्ष त्यांनीच म्हटलं असलं, तरी पडद्यावरच्या बाँडला त्यांनी पुरेपूर न्याय दिला. म्हणूनच त्यांचा बाँड अधिक संस्मरणीय ठरला.**

▸▸ अपर्णा पाटील

देखणे अभिनेते चांगला अभिनय करतीलच, याची खात्री नसते. सर रॉजर मूर यांच्याबाबतीत तर पैजेवर कोणीही ते सांगू शकत होतं. देखणे असल्यानं ते यशस्वी मॉडेल तर झाले, पण त्यांच्या अभिनयाबद्दल विश्वास वाटावा अशी स्थिती नव्हती. पण बाँड त्यांच्या आयुष्यात आला आणि हे चित्र पालटलं.

मॉडेलिंग ते अभिनय असा प्रवास करताना त्यांचं देखणेपण वादातीत होतं. पण अभिनय क्षमतेवर कायम प्रश्नचिन्ह होतं. ही शंका इतकी गंभीर होती, की त्यांचा पहिल्या पत्नीपासून घटस्फोट होण्याचं कारणही ते होतं. मूर यांनी मात्र टीव्हीवर बस्तान बसवलं. ते सेंट या मालिकेतून सायमन टेम्पलर ही भूमिका करायला लागले. रॉबिनहूड छापाचा हा ब्रिटिश गुन्हेगार साकारताना थोडीफार मारधाड, बंदूकबाजीही त्यांना शोभून दिसली होती. बाँड साकारताना ती नंतर कामी आली.

त्यांच्या मॉडेलिंग करिअरची दखल घेऊन या देखण्या नटाला एमजीएमने लाँच करायचं ठरवलं. इतकंच नाही, तर चक्क सात सिनेमांचा करार करून टाकला होता. पण हे चित्रपट साफ आपटले. तरी त्यांच्यावर विश्वास टाकणारेही कमी नव्हते.

सिनेमातल्या अपयशानंतर ते टीव्हीकडे वळले. त्यावेळी वॉर्नर ब्रदर्सनी त्यांच्याशी करार केला. पण या सिनेमांतून निराशाच हाती आली. तरी त्याचवेळी टीव्हीवरचा त्यांच्या इन्याहो प्रचंड गाजला. त्यानंतर अलास्कन्स ही सीरिजही त्यांच्या लोकप्रियतेत भर घालणारी ठरली. माव्हरिक सीरिजमधील ब्यू माव्हरिक साकारला.

हॉलिवूडला मात देऊ शकेल असा ब्रिटिश गुप्तहेर जेम्स बाँडच्या रूपात कादंबरीतून पडद्यावर येऊ घालण्याचा तो काळ होता. बहुचर्चित डॉ. नो या बाँडपटाची घोषणा होऊन अभिनेत्यांची शोधाशोधही सुरू झाली. तरी मूर काही त्या वाट्याला गेले नाहीत. पण शॉन कॉनरी यांनी बाँडपटांतून संन्यास घेण्याचं जाहीर करून टाकलं, आणि नव्या अभिनेत्याचा शोध बाँडच्या भूमिकेसाठी सुरू झाला. मग मात्र त्यांनी बाँड साकारण्याची तयारी सुरू केली. वजन कमी केलं. केसही कमी केले. बाँड साकारण्यास आपण योग्य आहोत, इतका आत्मविश्वास त्यांना टीव्ही सिरीजमधून मिळालेला होता.

शॉन कॉनरी यांच्याकडून त्यांच्याकडे बाँड आला, त्यानंतर तब्बल बारा वर्षे (१९७३ ते १९८५) सातवेळा त्यांनी बाँड पडद्यावर जिवंत केला. पन्नाशी उलटत असताना बाँड साकरणं जमलं ते त्याचं देखणेपणामुळे. बाँडच्या तोंडी वन लायनर हे मूर यांचं खास वैशिष्ट्य म्हणता येईल. मूर यांना बाँड कॉनरींपेक्षा अधिक देखणा करताना, बाँडच्या व्यक्तिमत्त्वामधलं गूढ वाढवत नेलं.

### हसा लेको

**शुगर**

नवरा डॉक्टरकडे जाऊन घरी येतो. त्यानंतर तो रोज एकदा तरी साखरेचा डबा उघडून पाहतो.
**बायको** – काय हो, तुम्ही रोज साखरेचा डबा उघडून का पाहता?
**नवरा** – अगं, डॉक्टरांनी रोज शुगर चेक करायला सांगितलीय.

**प्रेषक** : श्रीधर जाधव

## चित्र प्रदर्शन

▸▸ पुणे टाइम्स टीम

ईशान्य मॉल इथल्या टिल्टिंग आर्ट गॅलरी इथं आजपासून (दि. २५) 'युनिफिकेशन' नावाचं चित्रप्रदर्शन आयोजिण्यात आलं आहे. या प्रदर्शनाच्या निमित्तानं एकाच व्यासपीठावर पुण्यातील अनेक सर्जनशील कलाकार आले आहेत. यात अमूर्त चित्रांसह आकृतीबंध असलेली चित्रं, व्यक्तिचित्रं, निसर्गचित्रं, मिक्स मीडिया असं चित्रांतील वैविध्य सादर करण्यात आलं आहे.



झारखंडच्या मुक्ता गुप्ता, साताऱ्याच्या मानसी पळशीकर, पुण्यातील सुरेंद्र कुदापणे, रमेश थोरात आणि गजराज चव्हाण, मुंबईचे विनोद शर्मा, डी. एस. राणे आणि पंकज झा, दिल्लीतील विमलचंद, असुर्वेध, सुरेश कुमार आणि भूवल प्रसाद आणि राखी अगरवाल या देशभरातील कलाकारांच्या कलाकृती या प्रदर्शनात रसिकांना एकत्रित पाहायला मिळणार आहेत. गोल्फ कोर्सच्या समोरील ईशान्य मॉलमधील टिल्टिंग आर्ट गॅलरी इथं १० जूनपर्यंत सकाळी ११ ते रात्री आठ या वेळेत (सोमवारी बंद) हे प्रदर्शन सर्वांसाठी खुलं राहणार आहे.

## वजनदार ॲक्सेसरीज



**मुलांचा वॉर्डरोबमध्ये सध्या वजनदार ॲक्सेसरीजनं पुन्हा स्थान मिळवलं आहे.**

▸▸ पुणे टाइम्स टीम

पेहराव कोणताही असो, फॅशनमध्ये ॲक्सेसरीजची क्रेझ कमी होण्याची चिन्हं नाहीत. त्यात मुलांचा वॉर्डरोब म्हटलं, की ठरलेलं एक गणित होतं. अतिशय हलक्या वजनाच्या आणि 'डेलिकेट' म्हणवल्या जाणाऱ्या ॲक्सेसरीज मुलं वापरायची.

आता मात्र हे चित्र बदलताना दिसतंय. हातातल्या ब्रेसलेटपासून थंबरिंगपर्यंत आणि जॅकेट-जर्किन आणि जीनपासून कॅप आणि बेनीजपर्यंत वजनदार ॲक्सेसरीज मुलांना आवडू लागल्या आहेत. या नव्या फॅशनविषयी.

हलक्या वजनाची ब्रेसलेट्स जाऊन आता वजनदार ब्रेसलेट्सच पुन्हा मुलांच्या हाती दिसू लागली आहेत. यात पारंपरिक डिझाइन्ससह मोहेंजोदडो, साखळीचं ब्रेसलेट, खास बायकिंगसाठीची ब्रेसलेट असे ब्रेसलेटचे विविध प्रकार पाहायला मिळतात. गळ्यातल्या साध्या आणि लाकडी पेंडंटची जागाही वजनदार मेटल पेंडंट्सनी घेतली आहे. त्यात बॉक्सर हँड, डेडली पेंडंट, पारंपरिक प्रकारात ओंकार, स्वस्तिक, शंख यांचा समावेश आहे. यात चांदी आणि सोन्याच्या पेंडंट्सचाही समावेश आहे.

परिधान करायच्या ॲक्सेसरीज कमी म्हणून की काय, आता या ॲक्सेसरीज कॅप, जर्किन आणि बेल्टमध्येही दिसू लागल्या आहेत. कॅपला हेवीवेट रिंग आता अधिक संख्येनं दिसू लागल्या आहेत. जर्किनला वजनदार धातूच्या बटण आणि चेनची जोड मिळू लागली आहे. स्टायलिश जर्किन्सच्या चेन पूर्ण जर्किनला लावण्याची फॅशन सध्या 'इन' आहे. 'मेटल बटण'च्या जर्किन्सना सध्या सर्वाधिक मागणी आहे. दोन हजार रुपयांपासून १० हजारापर्यंत त्याच्या किंमती आहेत. ही जर्किन पार्टीवेअर आणि इव्हेंटसाठी वापरली जातात. त्याचप्रमाणे सध्या मेटल बेल्टची फॅशनही लक्षवेधी ठरतेय. विशेषत: पार्टी, पब आणि कॅफेजमध्ये जाणाऱ्यांना मेटल बेल्टची फॅशन रूढ करण्याचं श्रेय जातं. तुम्हाला आवडतील, तशा ॲक्सेसरीज बेल्टला जोडूनही मिळतात. प्रत्येकाच्या आवडीचं आणि फॅशनचं प्रतिबिंब त्यात पाहायला मिळतं.

